# प्रकरण पाचवे

## समारोप

१८ व्या शतकातील मराठ्यांचा इतिहास वस्तुतः संपूर्ण भारताचा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापिलेल्या या स्वराज्याचे १८ व्या शतकात भारतातील एका प्रमुख राजकीय सत्तेत रूपांतर झाले आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मराठ्यांचे वर्चस्व उत्तर आणि दक्षिण भारतात प्रस्थापित झाले. म्हणूनच मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँड डफ म्हणतो, इंग्रजांनी भारत जिंकला तो मराठी सत्तेचा बीमोड करून. मराठी सत्तेचा उदय, विकास आणि अस्त कसा झाला हे कोडे उलगडविण्यासाठी देशी-विदेशी इतिहासकारांनी १७ व्या शतकापासून अनेक प्रयत्न केले.

मराठ्यांचा इतिहास मराठी माणसाने अस्सल साधनांच्या साहाय्याने लिहिला पाहिजे अशा ध्येयाने प्रेरित होऊन काशिनाथ नारायण साने, वासुदेव शास्त्री खरे, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, दत्तात्रय बळवंत पारसनीस या थोर इतिहास संशोधकांनी विपुल साधन-सामग्री अभ्यासकांना उपलब्ध करून दिली.

परंतु मराठ्यांच्या इतिहासावर भरपूर प्रकाश टाकू शकणारे मुबलक फारसी साहित्य उपलब्ध असूनही त्या भाषेचे ज्ञान अवगत करून मराठ्यांचा इतिहास लिहिणे ही मोठी अडचणीची गोष्ट होती. ती अडचण दूर करण्याचे अत्यंत मोलाचे कार्य इतिहासकार सेतुमाधवराव पगडी यांनी केले. पगडी हे अनेक भाषांचे पंडित होते. मराठी, कन्नड, तेलगू, हिन्दी, उर्दू, फारसी, कोलामी, बंगाली, इंग्रजी, गोंडी इत्यादी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. वयाची ८२ वर्षे उलटून गेल्यावर त्यांनी नेपाळी भाषा शिकून घेतली. तीही कुणाकडून ? तर बंद दृष्टीला जगाच्या सर्व वाटा बंद झाल्यावर राहता राहिलेल्या गच्चीत फिरताना

भेटलेल्या गुरखा-पत्नीकडून. तिचे नांव दुनाकुमारी. ''दुनाकुमारी'' हा त्यांचा लेख म्हणजे मधमाशीच्या निरालसतेने ते कुठून कुठून काय काय मिळवित होते याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

उर्दूतील शंभरापेक्षा जास्त साहित्यिकांच्या निरनिराळ्या कलाकृतींचा आपल्या शैलीदार भाषेत मराठी भाषिकांना परिचय करून देण्याची मोलाची कामगिरी त्यांनी केली. अनेकविध व्याख्यानांतून त्यांनी इतिहासाची महाराष्ट्राला ओळख करून दिली. म्हणून पगडींच्याकडे इतिहासाचा एक चालता बोलता संगणक म्हणून पाहिले जात होते. त्यांच्या या बहुभाषिकत्वामुळे समग्र भारतीय भाषा, इतिहास आणि संस्कृती यांची निकोपपणे ते छाननी करू शकले.

सेतुमाधवराव पगडी यांचे जीवन म्हणजे वाहती ज्ञानगंगा होती. ते अखंड ज्ञानपिपासा असलेले - ज्ञान देऊ इच्छिणारे, लहान मोठ्यांसाठी अखंड ज्ञान देण्यास आसुसलेले व खेळकर आणि आनंदी वृत्तीचे होते. एक मान्यवर इतिहास संशोधक म्हणून आणि इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे ''पद्मभूषण'' किताबाने गौरविले गेलेले सेतुमाधवराव पगडी संपूर्ण महाराष्ट्राला परिचित होते व आहेत. उच्च विद्याविभूषित असलेल्या पगडींचे बहुतेक आयुष्य प्रशासकीय सेवेत गेल्यामुळे वक्तशीरपणा, बोलण्यावागण्यातील शिस्त, सतत क्रियाशील असणे, जबाबदारीची जाणीव, निर्णायक शक्ती, अभ्यासूपणा, धीरोदात्त, विजयी, सुसंस्कृत, पंडित, सन्माननीय, स्थितप्रज्ञ, सर्वांशी प्रेमाने वागणे इत्यादी सद्‌गुणांनी त्यांचे व्यक्तीमत्व भारलेले होते.

आशावाद आणि सामाजिक बांधिलकी हा सेतुमाधवरावांचा गुणधर्म. साहित्य हा इतिहासाप्रमाणेच त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. समोरची

व्यक्ती किंवा घटना इतिहासकालीन असते की आताची, तिची परीक्षा ते सारख्याच हुरूपाने करत. म्हणूनच त्यांच्या इतिहास कथनाला रूक्षपणा येत नाही. रसाळपणा हा त्यांच्या लेखनाचा स्थायिभाव होता आणि इतिहास तज्ज्ञ असल्यामुळे त्याला नेमकेपणाची जोड मिळाली आहे. या गुणांमुळे त्यांचे लेखन वेधक व चिंतनशील देखील बनलेले आढळते.

इतिहास हा पगडींच्या आवडीचा विषय. शकावली आणि संख्या त्यांना मुखोद्‌गत असत. म्हणूनच अचाट विद्वता आणि संगणकासारखी स्मरणशक्ती असलेल्या पगडींनी आपल्या रंजक व रसाळ वाणीने सर्व मराठी जनतेला भारावून टाकले होते. ललित साहित्याची तर त्यांना गोडी होतीच पण सुफी तत्वज्ञानासारखा विषयही त्यानी अभ्यासला होता. फार काय कोणताच विषय त्यांच्या प्रतिभेला नावडता नव्हता.

लहानपणापासूनच सेतुमाधवरावांच्यावर अनेक संस्कार झाले. वडिलांच्यामुळे रामायण, महाभारत, भागवत इत्यादींची गोडी लागली. आलेल्या संकटांना धैर्याने तोंड देणे, आयुष्यात कधीही खचून न जाणे, संसारातील आपल्या जबाबदाऱ्या न कुरकुरता पार पाडणे या गोष्टी ते वडिलांकडून शिकले. प्राथमिक शिक्षण जसे त्यांनी इंग्रजी माध्यमातून पूर्ण केले, त्याचप्रमाणे त्यांचा उर्दू व फारसी शिक्षणाचा पायाही प्राथमिक आवस्थेतच पक्का झाला होता. त्याच सुमारास घरी खाजगी शिक्षकांकडून मराठी भाषेचे शिक्षण त्यांना मिळाले. त्यामुळे शिक्षणाच्या बाबतीत ते फारच सुदैवी ठरले. इतर इतिहासकारांप्रमाणे त्यांना शैक्षणिक आवस्थेत संघर्ष करावा लागला नाही.

सेवावृत्तीतील निर्बंधामुळे त्यांच्या लेखणीला ललित साहित्याच्या क्षेत्रात स्थानबध्द व्हावे लागले. तेव्हा मराठवाड्यातील गद्य आणि पद्य निर्मित करणाऱ्या अनेक उपेक्षितांचे अंतरंग त्यानी जनतेसमोर सहृदयतेने मांडले. मातृभाषा बोलणाऱ्या प्रदेशापासून - मराठवाड्यापासून - दूर तेलंगणात पाठविण्यात आले. त्यावेळी 'वरंगलचे काकतीय राजे' आणि 'त्रिलींग देशांतील दैनंदिनी' ही त्यांची पुस्तके बाहेर आली.

नागर जीवनाचा वारा लागणार नाही अशा आदिवासींच्या प्रदेशात त्यांची नेमणुक झाली. परिणामी गोंडी आणि कोलामी भाषेंचे व्याकरण, आदिवासियांच्या दंतकथा आणि आचारविचारांचा परिचय लोकांना झाला. 'निर्वाहः प्रतिपन्न वस्तुषु' हे वचन समोर ठेवून कसल्याही प्रतिकूल परिस्थितीला वेठीला लावण्याची असाधारण गुरूकिल्ली पगडींना लाभली होती.त्यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचा सदुपयोगच केला.

राज्यशास्त्रासारख्या विषयांत एम्.ए. असूनही ते इतिहास संशोधक बनले. डॉ.डी.डी.कोसंबी, प्रा.रंगनाथ झा, गुरूदेव रानडे, डॉ.ईश्वरीप्रसाद, डॉ.ताराचंद, डॉ.वेणीप्रसाद इत्यादी नावाजलेल्या व तज्ज्ञ विचारवंतांच्या मार्गदर्शनामुळे सेतुमाधवराव पगडी यांना संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली आणि ते श्रेष्ठ इतिहासकार झाले. मूलतः पगडी यांना साहित्यात अभिरूची होती.कारण विद्यार्थी दशेपासून त्यांना अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके व आत्मचरित्रे वाचण्याचा मोठा छंद होता. इंग्रजी, उर्दू, हिन्दी, फारसी साहित्याचा त्यांचा अभ्यास विपुल होता. म्हणून पगडी यांना साहित्यकार ही पदवी शोभून दिसली असती. परंतु योगायोगाने पगडी इतिहास संशोधनाकडे

वळले. प्रचंड बुध्दीमत्ता व कष्ट करण्याची तयारी असल्यामुळे पगडी यांना ऐतिहासिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करता आली. इ.स.१९६१ सालापासून पगडी खऱ्या अर्थाने मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले. मराठ्यांच्या इतिहासावर जास्त भर देवून ते लिखाण व संशोधन करू लागले.

भारताच्या सर्व भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत मराठ्यांचा इतिहास नेऊन पोहचविण्याचे सत्र पगडींनी सुरू केले. त्यांनी लिहिलेले शिवचरित्र सर्वत्र लोकप्रिय बनत गेल्यामुळे देशभरातून पगडींना व्याख्यानाची असंख्य निमंत्रणे येवू लागली. त्या संधीचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला आणि त्या निमित्ताने भारतभर हिंडून व्याख्याने व भाषणांच्या माध्यमातून त्यांनी मराठ्यांच इतिहास भारतीय जनतेपुढे मांडण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. उत्कृष्ट वक्तृत्व शैली व बहुभाषिकत्व या त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळे सर्वत्र त्यांची व्याख्याने व भाषणे अतिशय लोकप्रिय ठरली. गंभीर इतिहास लेखनाबरोबरच जनसामान्यांत इतिहासाबद्दलची रूची वाढावी म्हणून लोकरूचीला अनुसरून सोपा इतिहास लिहिण्यात आणि व्याख्यानांच्या रूपाने तो सांगण्यात पगडी अग्रेसर राहिले.

सेतुमाधवराव पगडी यांनी इतिहास संशोधन व व्याख्यानाच्या निमित्ताने संपूर्ण भारतभर सुमारे दीड लाख मैलांचा प्रवास केला. त्यांनी विविध ठिकाणी दीड हजार व्याख्याने दिली. बाराशेच्यावर लेख लिहून वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून आणि नियतकालिकातून प्रकाशित केले. त्यांच्या या कार्याचा यथोचित गौरवही झाला. केंद्रसरकारने १९९४ साली राष्ट्रपतींच्या हस्ते ''पद्मभूषण'' हा किताब देवून पगडींचा सन्मान केला. एक थोर इतिहासकार

म्हणून देशभरात त्यांचा अनेक ठिकाणी सत्कार झाला.

पगडींनी मराठ्यांच्या इतिहासाबरोबरच जाणीवपूर्वक प्रयत्न करून उपलब्ध साधनांच्या आधारे शिवपूर्वकालीन महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकून तो दुर्लक्षित काळ प्रकाशात आणण्याचे कार्य केले. उपलब्ध साधनांच्या आधारे त्यांनी संपूर्ण मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा आलेखच आपल्या लिखाणातून मांडला आहे. शिवछत्रपतींपासून ते पेशवा दुसरा बाजीराव पर्यंतच्या काळातील मराठ्यांच्या इतिहास ची मांडणी होवून त्यावर अनेक इतिहासकारांनी ग्रंथ लिहिले आहेत. सर्व इतिहासकारांचा भर याच काळावर राहिलेला आहे. भारताच्या मध्ययुगातील शिवपूर्वकालीन महाराष्ट्र निस्तेज होता, असा बहुतेकांचा समज झाल्यामुळे त्या काळाकडे त्याचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. तथापि शिवपूर्वकाळासंबंधी इतरांनी केलेल्या दुर्लक्षाबद्दल खंत व्यक्त करून मराठ्यांच्या जडणघडणींच्या संदर्भात शिवपूर्वकाळ अत्यंत महत्वाचा असल्याचे मत सेतुमाधवरावांनी मांडले.

पगडी यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू आहेत आणि त्यातला एक महत्वाचा पैलू म्हणजे इतिहास संशोधन हा होय. निजाम राजवटीच्या गुदमरल्या वातावरणाला वैतागलेले पगडी महाराष्ट्र राज्यात आल्यानंतर त्यांनी आपले उरलेले संपूर्ण आयुष्य महाराष्ट्र व मराठीच्या सेवेत खर्ची घातले. त्यांनी केलेली महाराष्ट्र शासनाची सेवा, मराठी साहित्यात घातलेली भर आणि मराठ्यांच्या इतिहासातील त्यांचे मोलाचे संशोधन हे त्यांच्या महाराष्ट्र प्रेमाचेच प्रतीक ठरते.

पगडींचे मुंबईत आगमन हे त्यांच्या आयुष्यात क्रांतीकारकच

ठरले. कारण लिहिण्याची आणि भाषणाची अमाप संधी त्यांना मिळाली मुंबईतच. त्यांनी भाषणाचे, लेखनाचे, संशोधनाचे व्रत अखंडपणे चालविले. त्यांनी जोडलेले मित्र आणि सहकारी यांनी नेहमीच त्यांना प्रोत्साहन दिले. उर्दू - फारसीचे गाढे विद्वान नजीब अश्रफ, अब्दुल सत्तार दळवी, विद्वान साहित्यिक न.र.फाटक, अ.का.प्रियोळकर, पत्रकार आणि रसिक मित्र बावडेकर, विद्याधर गोखले व गोविंद तळवलकर, प्रकाशक भटकळ, परचुरे, अनंतराव कुलकर्णी, विदुषी दुर्गा भागवत, कमलाबाई टिळक, वसंतराव कानेटकर, कादंबरीकार रणजित देसाई, ना.स.इनामदार, रसिकवर्य अरूण आठले अशी अनेक नांवे आढळतात. या सर्व मित्रांमुळे त्यांचे जीवन सुखी बनले, समृध्द बनले आणि विशेष म्हणजे सुंदर बनले.

मोगल-मराठा संघर्षाच्या इतिहासावर इंग्रजी आणि मराठी मिळून पगडींची २५च्यावर पुस्तके प्रसिध्द झाली आणि इतिहास क्षेत्राला मोठी अनुकूल अशी कलाटणी मिळाली. मराठ्यांचा इतिहास हा पगडींचा जिव्हाळ्याचा विषय. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात मराठ्यांचे ऐतिहासिक कर्तृत्व मोलाचे ठरते. देशातील वर्तमान व भावी पिढीला मराठ्यांच्या इतिहासापासून प्रेरणा मिळाल्या पाहिजेत, या उद्देशाने मराठ्यांच्या इतिहासाचा परिचय सर्व देशबांधवांना करून देण्यासाठी पगडी आयुष्यभर झटले. मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन करताना इतिहासकाळातील परिस्थिती, रूढी, परंपरा व नीतिमूल्यांचे भान ठेवूनच त्यांनी ऐतिहासिक व्यक्ती व घटनांचे मूल्यमापन केले. म्हणूनच त्यांच्या इतिहास लेखनातून शिवचरित्र व संभाजी चरित्र यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

मराठ्यांच्या इतिहासाची मीमांसा करताना पगडींनी ऐतिहासिक साधनांचा वापर तर केलाच, परंतु त्याचबरोबर आवश्यक व अपरिहार्य ठिकाणी तर्कसंगतीचाही आधार घेतला. इतरांच्या मुद्यांचे खंडण करून स्वत:ची मते मांडताना पगडींनी तर्कसंगत विश्लेषण व विवेचनावर अधिक भर दिला.

स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये इ.स.१८०० ते इ.स.१९१० या अकरा दशकांत हैदराबाद राज्यात निरनिराळ्या ठिकाणी झालेल्या स्वातंत्र्य - संपादनाच्या प्रयत्नांचा वृत्तांत संक्षिप्तपणे पगडींनी कथन केला आहे. १८५७ चे क्रांतियुध्द, वासुदेव बळवंतांची उठावणी, चाफेकर बंधूंचे क्रांतिकार्य, कान्हेरे प्रकरण या घटना भारतीय स्वातंत्र्य युध्दांत महत्वाच्या आहेत. त्या घटनांचे पडसाद आणि धागेदोरे हैदराबाद राज्यात कसे आढळतात याचे विवेचन सरकारी दप्तरखान्यांतील अस्सल कागदपत्रे पाहून पगडींनी केले आहे. हे त्यांचे योगदान फार मोलाचे आहे.

सुमारे चार हजार ग्रंथांचे वाचन, भारतभर हिंडून दीड लाख मैलांचा प्रवास व दिलेली शेकडो व्याख्याने , बाराशे लेख व चौसष्ट ग्रंथांचे स्वतंत्र लिखाण हा पगडींच्या विद्वत्तेचा स्पष्ट आलेखच मानावा लागेल. मोगल दरबारातील बातमीपत्रे व मोगल सरदारांच्या पत्रव्यवहाराचा सुमारे पाच हजार पाने भरतील एवढा फारसी मजकूर मराठीतून अनुवादीत केला.

सेतुमाधवराव पगडींनी २५ उर्दू आत्मचरित्रकार, ४० कवी, १० विनोदी लेखक आणि २५ प्रबंधकार अशा १०० उर्दू साहित्यिकांचा महाराष्ट्राला परिचय घडवून दिला. त्यानी एकूण ६४ ग्रंथांचे लेखन केले आहे. त्यातील १४

इंग्रजी भाषेत आहेत आणि ५० मराठी भाषेत आहेत. पगडींनी सुमारे ३४ ग्रंथ इतिहासविषयक व ३० ग्रंथ ललित साहित्यावर लिहिले.

''पानिपतचा संग्राम'' या ग्रंथाचे लेखक दोघे असले तरी ग्रंथ निर्मितीच्या कार्यात पगडींचा सिंहाचा वाटा असल्याचे दुसरे लेखक न.र. फाटक हे स्वत: कबूल करतात. फारसी साधन ग्रंथांच्या मराठी अनुवादाचे जे कार्य पगडींनी केले आहे. त्याबद्दल न.र.फाटक आपली भावना व विचार पुढील शब्दात व्यक्त करतात.

'' फारसी साधनांची उणीव पानिपत संग्रामाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना वाटणार नाही अशी भरीव कामगिरी पगडींनी तडीस नेलेली आहे''.[१]

महाराष्ट्रातील दोन विद्वानांच्या कार्याचे हे फळ असले तरी शेजवलकरांच्या 'पानिपत १७६१' या ग्रंथाची सर या ग्रंथास नाही हे नम्रपणे म्हणणे भाग आहे.

विशेषत: पगडी यांनी इतिहासावर जी महत्वाची पुस्तके लिहिली त्यापैकी मराठ्यांच्या इतिहासावर जी पुस्तके लिहिली त्यात जवळ जवळ राजकारणाचाच भाग येतो. शिवाजी महाराजांच्या राजकारणावरच त्यांनी भर दिला आहे. परंतु त्र्यं.शं. शेजवलकर व जदुनाथ सरकार यांचेप्रमाणे चिकित्सक दृष्टी आणि समतोल अन्वयार्थ या संदर्भात छत्रपती शिवाजीच्या कारकीर्दीची मीमांसा त्यात आढळत नाही.

'सेवा निवृत्तीनंतर सन १९६९ साली ''जीवनसेतु'' नावाचा आत्मचरित्रपर ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यातील एकाही प्रकरणातून राजकीय तसेच

सामाजिक दृष्टीकोन दिसून येत नाही. हे आत्मचरित्र अनेक लेखन गुणांनी व विचारांनी समृध्द आहे. यात १९३३ ते १९४८ सालापर्यंत हैदराबाद संस्थानात उद्भवलेल्या अनेक घटनांचे व राजकीय उलाढाली आणि राजदरबारातील खाजगी गोष्टींचे तपशील आढळतात '[२]

शिवाजी महाराजांना शहाजीकडून प्रेरणा मिळाली नाही. शिवाजीच्या स्वराज्यात शहाजीचा हातभार नाही, असे पगडी म्हणतात. पण हे खरे नाही. कारण शिवाजीराजांस त्यांच्या वयाच्या १० ते १२ वर्षे या काळात वडील शहाजीराजांकडून बंगलोरास शिक्षण मिळाले होते. शहाजीराजांनी शिवाजी महाराजांस स्वराज्य स्थापण्याचा मंत्र दिला. त्याला प्रशिक्षण दिले. साहित्य दिले. सरंजाम दिला. स्वराज्य संपादनाच्या कामगिरीत प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्यासाठी सोबत मातोश्री जिजाबाईस देऊन त्यांची रवानगी पुण्याच्या आपल्या जहागिरीवर केली. शिवाय जिजाबाईनी शिवाजीराजांस पहिली दहा वर्षे आपल्या सान्निध्यात ठेवून रामायण, महाभारतांतील पराक्रमी पुरूषांच्या गोष्टी ऐकविल्या असणार. शहाजीराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगून त्यांच्यासारखा पराक्रम करण्याची इच्छा शिवाजीराजांच्या मनांत जागृत केली असावी.

पगडी आपल्या जीवनाचा विचार करताना लिहितात, '' भोवतालच्या जगाने मला घडविले. मी इतकेच केले की, प्राप्त संधी टिपीत गेलो. सुंदर लेणी खोदणे आवाक्याबाहेर आहे,पण लेखणीने चार रेघोट्या मारून या भूदरात मी माझी खूण ठेवू शकलो, हेच माझे मोठे समाधान. नाहीतरी जीवनात समाधानापेक्षा अधिक सुख ते काय असू शकेल. माझे उरलेले काम संपविण्यासाठी मृत्यू जरा लांबणीवर पडला तरी चालेल. मृत्यू आला तरी हरकत नाही, पण मी काही आपणहून त्याच्याकडे चालत जायला तयार नाही''.[३]

## संदर्भ व तळटीपा

१) फाटक न.र. व पगडी सेतुमाधवराव, पानिपतचा संग्राम, पृ.४

२) देशपांडे सुरेश रघुनाथ, मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, पृ.१६२

३) पगडी सेतुमाधवराव, तन्वी-श्यामा, पृ.१६८